# निशाण क्र.५९ वरील आदेश

१ प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र. ८ हिचे पालक म्हणून नाझर यांची झालेली नेमणूक रद्द होणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ८ हिचा पालक म्हणून प्रतिवादी क्र. ४ याची नेमणूक होणेसाठी वादीने अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने सदर अर्जावरील आदेशानुसार प्रतिवादी क्र. ८ ची पालक म्हणून नाझर यांची नेमणूक केली आहे. प्रतिवादी क्र. ८ ही सध्या प्रतिवादी क्र.१ व त्याची पत्नी मृणाल यांचेसोबत राहत असून तेच तिचे पालनपोषण, औषधपाणी इत्यादी साठीचा खर्च करतात. प्रतिवादी क्र.८ ही मतिमंद असून ती स्वत: दावा मिळकतीबद्दल, दाव्याबद्दल व इतर कोणत्याही वस्तुस्थितीबद्दल माहिती देवू शकत नाही. प्रतिवादी क्र. ८ तर्फे नाझरांनी दिलेली कैफियत कोणाच्या माहिती आधारे दिली याचा काहीही बोध होत नाही. नाझर यांनी प्रतिवादी क्र.८ ज्याच्या बरोबर राहत होती त्या प्रतिवादी क्र.१ व त्याच्या पत्नीस कधीही बोलाविले नव्हते. नाझर यांनी तिच्या कुठल्याही हक्काचे संरक्षण केले नाही. तिच्या वतीने त्यांनी कैफियत देताना कोणत्याही वकिलांची अगर तज्ज्ञ माणसाची नेमणूक करून घेवून त्याचे आधारे कैफियत दिली नाही. प्रतिवादी क्र. ८ तर्फे वादीचा उलटतपास देखील नाझरांनी नाकारला आहे. प्रतिवादी क्र. ८ हिचे हक्काचे संरक्षण करण्यास नाझर असमर्थ ठरले आहेत. सबब, या सर्व कारणास्तव नाझर यांची प्रतिवादी क्र. ८ ची पालक म्हणून झालेली नेमणूक रद्द होणेबाबत प्रस्तुत प्रतिवादीने विनंती केली आहे.

२. वादीने नि.क्र.६० ला म्हणणे दाखल करून अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार केवळ या कामी विलंब करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज देण्यात आला आहे. वादीने सरतपास ऑक्टोबर २०१६ मध्ये दिला आहे. दाव्यातील उर्वरित सर्व प्रतिवादींचा उलटतपास घेतला आहे. सध्या प्रतिवादी क्र.१ तर्फे वादीचा उलटतपास घेण्यासाठी हे प्रकरण नेमले आहे.

प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यास दाव्याचे कामकाज लांबणार आहे. यापूर्वी नि.क्र. ५ वर दिलेल्या म्हणण्यामध्ये नाझरांच्या नियुक्तीबाबत प्रतिवादी क्र.१ याने हरकत घेतली नव्हती. याउलट, प्रतिवादी क्र.४ ची पालक म्हणून नेमणूक होणेसाठी त्यांनी हरकत घेतली होती. त्यामुळे न्यायालयाने सक्षम अधिकारी म्हणून नाझरांची नियुक्ती केली आहे. त्यांनी सक्षमपणे तिच्या बाजूने कैफियत मांडली आहे. पुरावा सुरू होईपर्यंत प्रस्तुत प्रतिवादीने या नियुक्तीस हरकत घेतली नव्हती. प्रतिवादी क्र.८ च्या वतीने नाझर यांनी कोणता निर्णय घ्यावा, कोणती कामे करायची हे ठरविणेचा अधिकार प्रतिवादी क्र.१ ला नाही. प्रतिवादी क्र.८ च्या वतीने नाझरांनी दिलेल्या कैफियतीमध्ये त्यांनी तिच्या हिताविरूध्द् कोणतेही विधान केले नाही. प्रतिवादी क्र.१ ला स्वत:ला प्रतिवादी क्र.८ चा पालक म्हणून नियुक्त करून घेवून स्वत:च्या सोयीच्या उद्देशाने त्याने हा अर्ज दिलेला आहे. या सर्व कारणास्तव वादीने प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेची विनंती केली आहे.

३. नाझरांनी नि.क्र.६१ ला म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार नि.क्र.५ चे अर्जानुसार प्रतिवादी क्र.४ याला प्रतिवादी क्र.८ चा पालनकर्ता म्हणून नोटीस काढली होती. तो प्रतिवादी क्र.८ चा पालनकर्ता म्हणून इच्छुक नसल्यामुळे नाझर यांची नियुक्ती केली आहे. प्रतिवादी क्र.८ ही मतिमंद असल्यामुळे नाझर यांच्या समक्ष प्रतिवादी क्र.८ ची सत्यता पाहून जो तिचे पालनपोषण, देखभाल करेल त्याच्याकडे प्रतिवादी क्र.८ चा हिस्सा देणेबाबत कैफियत मध्ये मागणी केली आहे व त्याप्रमाणे त्यांनी प्रतिवादी क्र.८ चा पालनकर्ता म्हणून कैफियत दिली आहे. नाझर हा फक्त नैसर्गिक पालन कर्ता असून प्रतिवादी क्र.८ च्या हिश्श्याबाबत जो काही निर्णय घ्यावयाचा असले तर ते सर्व अधिकार न्यायालयावर अवलंबून आहेत. सबब, या अर्जावर योग्य आदेश पारित होण्याची विनंती नाझर यांनी केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधिज्ञांचा व नाझर यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. वादी यांनी नि.क्र. ५ ला दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३२ नियम ३(२) प्रमाणे प्रतिवादी क्र.८ ही मतिमंद असल्यामुळे तिचा सख्खा भाऊ प्रतिवादी क्र.४ याला तिचा वादार्थ कालीन पालक म्हणून नेमणूकीबाबत अर्ज दिला होता. नि.क्र. ५ वरील आदेशामध्ये माझे विद्वान पूर्वाधिकारी यांनी प्रतिवादी क्र. ८ ही प्रतिवादी क्र.४ सोबत राहत असल्याचे दिसून येत नव्हते, या अर्जाची प्रतिवादी क्र.४ ला नोटीस मिळून देखील तो या अर्जाच्या कामी गैरहजर राहिला असे दिसून येत होते, त्यामुळे प्रतिवादी क्र. ८ च्या हक्कांचे सरंक्षण करणेसाठी प्रतिवादी क्र.८ चा वादार्थ कालीन पालक म्हणून नाझर यांची नेमणूक केल्याचे दिसून येते. सदरची नेमणूक दि.२४/०७/२०१४ इ. रोजी झाली आहे. नाझर यांनी दि.२३/०२/२०१५ इ. रोजी या कामी कैफियत दाखल केली आहे. त्यांनी दाखल केलेल्या कैफियतीबाबत शंका निर्माण करून तब्बल अडीच वर्षाहून अधिक काळानंतर प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे प्रतिवादी क्र.१ ने वादीचा उलटतपास घेण्यासाठी नेमल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ने हा अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. यावरून खरोखरच प्रतिवादी क्र.१ याला प्रतिवादी क्र.८ च्या हिताची काळजी असती तर त्याने त्वरित नि.क्र. ५ वरील आदेश आव्हानीत केला असता किंवा त्याच वेळी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असता. ज्या अर्थी प्रतिवादी क्र.१ ने वादीचा उलटतपास घेण्याची वेळ आली असताना अडीच वर्षाहून अधिक काळ लोटल्यानंतर प्रस्तुत प्रतिवादीने हा अर्ज दाखल केला आहे, त्या अर्थी प्रतिवादी क्र.१ याला प्रतिवादी क्र.८ च्या हक्काच्या संरक्षणाबाबत प्रमाणिकपणे काळजी असावी असे मला वाटत नाही.

६. वादी याने दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.२ ते ८ यांचा हिस्सा स्वतंत्रपणे मिळणेसाठी मागणी केली आहे. याउलट, प्रतिवादी क्र.१ याने

त्याच्या कैफियतीमध्ये प्रतिवादी क्र.८ चा दावा मिळकतीमध्ये हिस्सा नाही असे कथन केले आहे. यावरून प्रतिवादी क्र.१ हा प्रतिवादी क्र.८ च्या हक्कांचे संरक्षण करत आहे अगर तिचे हित जपत आहे असे वाटत नाही. किंबहुना त्याचा हेतू प्रतिवादी क्र.८ च्या हिताविरूध्द् आहे असे दिसून येते. ज्या व्यक्तीने प्रतिवादी क्र.८ चा हक्कच नाकारला असेल, त्या व्यक्तीची या अर्जातील हरकत प्रथमदर्शनी संशयास्पद वाटते. नाझर यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये जरी वादीचा दावा मान्य केला असला तरी देखील प्रतिवादी क्र. ८ हिचा हिस्सा तिला मिळावा असे स्पष्ट कथन केले आहे. त्यामुळे नाझर यांनी दिलेली कैफियत ही प्रतिवादी क्र.८ च्या हिताविरूध्द् आहे असे मुळीच वाटत नाही. या कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र नाही, असे मला वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे:

## **आदेश**

१. अर्ज फेटाळणेत येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक १०/११/२०१७